ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध पोर्टल्सचे सिक्युरिटी ऑडिटच्या कामाचे देयक अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: ई-गव्ह २०२६ /प्र.क्र.८/संगणक
चौथा मजला, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४००० ०३२
दिनांक : ०६ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

आयुक्त (शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र. आशिक/२०२५/सिक्यु.ऑडिट /ईगव्हर्नन्स/१४३ दि.०४.०६.२०२६.

प्रस्तावना:-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध पोर्टलल्सचे सिक्युरिटी ऑडिट करण्यासाठी M/s Digifortex Technologies Ptv. Ltd या कंपनीची एक वर्षासाठी निवड करून सदर कंपनीस कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध पोर्टलसचे सिक्युरिटी ऑडिट करून घेण्यात आलेले आहे. त्यानुसार आयुक्त (शिक्षण) यांनी त्यांच्या दि.०४.०६.२०२६ रोजीच्या पत्रान्वये देयके अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार, M/s Digifortex Technologies Ptv. Ltd या कंपनीस अदा करावयाची रक्कम रु. १,११,२५०/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ई-गव्हर्नन्स अंतर्गत विविध पोर्टलल्सचे सिक्युरिटी ऑडिटचे कामकाज करून घेण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने M/s Digifortex Technologies Ptv. Ltd या कंपनीस एकूण रु.१,११,२५०/- (अक्षरी एक लक्ष अकरा हजार दोनशे पन्नास रूपये फक्त) इतक्या रक्कमेस याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. याबाबत निधी वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

२. सदरचा खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८००-इतर खर्च (०२) संकिर्ण (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२H४५४), ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०२६-२७ च्या उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियमपुस्तिका २०१५ दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील उपविभाग- २ मधील अनुक्रमांक २७ अ मधील नियम क्र. ७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०६१५३०२४२४४९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARJUN ASHOK GIRAHAM

Digitally signed by ARJUN ASHOK GIRAHAM
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SESD, 2.5.4.20=C1300422597C5149006FE3B151E37C83067DCDA2A5885530175474850132323F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=41524CD000BBC1D5D1FF212378815B6BE4870FD0FCD2031260BAA18314B15437, cn=ARJUN ASHOK GIRAHAM
Date: 2026.08.06 15:31:03 +05'30'

(अर्जुन गिऱ्हाम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.

३) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे

४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

५) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.,

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १/२.

७) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.

८)कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई.

९) निवडनस्ती/संगणक.